लोकसभा
निवडणूक
जाहीरनामा
२०१९

राष्ट्रवादी
काँग्रेस पक्ष

# आओ मिलके देश बनायें



हमारा
आपका
हम सबका
भारत



श्री शरद पवार

# अनुक्रम


प्रस्तावना ... ४
काळाची गरज ... ६
शेती ... ७
आर्थिक विकास ... ८
रोजगार निर्मिती ... ९
सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर (MSMEs) भर ... १०
कामगार कायद्यांत सुधारणा ... ११
कर सुधारणा ... १२
भांडवली आणि वित्तीय बाजारपेठा ... १२
मानव संसाधन विकास ... १३
डिजिटल भारत ... १४
आरोग्याचा हक्क ... १४
महिला आणि बालविकास ... १५
बालसुरक्षा आणि महिला सक्षमीकरण ... १५
युवा आणि क्रीडा ... १६
ज्येष्ठ नागरिक ... १६
संरक्षण ... १७
राष्ट्रीय सुरक्षा ... १७
परराष्ट्र धोरण ... १८
व्यापारी धोरणे ... १८
शहर विकास ... १८
ग्रामीण विकास आणि पंचायत राज ... १९
वाहतूक ... १९
पर्यावरण ... १९
सामाजिक न्याय ... २०
अल्पसंख्याक ... २०
लोकशाही संस्थांची चौकट बळकट करताना ... २१
सार्वजनिक-खाजगी भागीदारीला नवसंजीवनी ... २२
MGNREGA (मनरेगा) ... २३
जल आणि सिंचन विकास ... २३
गृहनिर्माण ... २३
उत्पन्नातील असमानता ... २४


राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष



# प्रिय बंधू आणि भगिनींनो,

जात, संप्रदाय आणि धर्माच्या आधारे समाजात दुही माजवून त्याचा उपयोग स्वत:च्या लाभासाठी तसेच निवडणुकीतील यशासाठी करून घेणाऱ्या एका राजकीय गटाच्या प्रवृत्तीमुळे भारतीय लोकशाही सध्या एका गहिऱ्या संकटातून जात आहे. विरोधाभासाची गोष्ट म्हणजे यात राष्ट्रवादाचा वापर लोकांमध्ये फूट पाडण्यासाठी केला जात आहे. आपले मत उघडपणे मांडणे धोकादायक ठरू लागले आहे आणि सरकारच्या निर्णयांना आणि धोरणांना प्रश्न विचारणाऱ्यांवर देशद्रोही असल्याचा ठप्पा मारला जात आहे, त्यांच्यावर विश्वासघाताचा आरोप ठेवला जात आहे. विद्यमान सरकार स्वत:वर झालेली कोणतीही टीका ऐकून घेण्यास राजी नाही.

देशातील सध्याचे वातावरण अनिश्चिततेचे, अस्थिर आणि गुंतागुंतीचे बनले आहे. स्वातंत्र्यप्राप्तीच्या सात दशकांनंतर, लोकांमध्ये धर्माच्या नावे फूट पाडली जात आहे. नागरिकत्व सुधारणा विधेयक संमत करून घेण्यासाठी सरकारकडून आणल्या जात असलेल्या सक्रीय दबावामुळे ईशान्येकडच्या राज्यांमध्ये खळबळ माजली आहे.

एनडीए सरकारने देशावर पुढील अकल्पित संकटे ओढवून घेतली आहेत.

१. शेती आणि शेतकऱ्यांवर अत्यंत हालाखीची परिस्थिती
२. अर्थव्यवस्थेचा मंदावलेला वेग
३. बेरोजगारीमध्ये प्रचंड वाढ
४. देशावरील कर्जामध्ये दुप्पटीने वाढ
५. वाढत्या किमती आणि महागाई
६. भरकटलेल्या परराष्ट्र धोरणामुळे राष्ट्रीय सुरक्षेला निर्माण झालेला धोका



# प्रस्तावना

एनडीए सरकारच्या देखरेखीखाली देशाच्या लष्करावर आणि निमलष्करी दलांवर तीन मोठे दहशतवादी हल्ले झाले. या हल्ल्यांचे उत्तरदायित्व घेतले गेलेले नाही किंवा याला जबाबदार कोण हेही स्पष्ट केले गेलेले नाही ही धक्कादायक गोष्ट आहे. २००८ साली मुंबईवर दहशतवादी हल्ले झाले तेव्हा तत्कालीन युपीए सरकारने हे आपले अपयश असल्याचे मान्य केले होते, त्याचे उत्तरदायित्व स्वीकारले होते, या घटनेस जबाबदार असलेल्या नेत्यांना पदावरून हटविण्यात आले होते, सर्जिकल स्ट्राइक्स (लोकप्रियतेसाठी कोणतीही प्रचारकी भूमिका न घेता) हाती घेण्यात आले होते – त्यानंतर केंद्रामध्ये युपीए सरकार असेपर्यंत कोणतेही दहशतवादी हल्ले झाले नाहीत.

आर्थिकदृष्ट्या पाहायचे झाले तर एनडीए सरकारच्या काळात निश्चलनीकरणाचे फसलेले साहस आणि जोडीला शेती व इतर उद्योगांकडे झालेले दुर्लक्ष यामुळे नागरिकांची मोठीच दुर्दशा झाली आहे. बेरोजगारीने गेल्या ४५वर्षांतला निचांक गाठला आहे. कृषी उत्पन्नाच्या स्थिर आणि विद्यमान किमतींमध्ये लक्षणीय घट झाली असून त्यांनी गेल्या १४ वर्षांतला निचांक गाठला आहे. याच्या परिणामी ४० कोटी तरुण बेकारीच्या खाईत लोटले गेले आहेत आणि देशातील शेतकरी प्रचंड नाऊमेद आणि निराश झाला आहे.

राजकीय हेतूने घटनात्मक स्वायत्त संस्थांची मोडतोड केली जात आहे.

मागील लोकसभा निवडणुकांमध्ये एनडीएने आपल्या जाहिरनाम्यामध्ये केलेल्या दाव्यानुसार भ्रष्टाचार समूळ नष्ट होण्याऐवजी भांडवलशहांशी केलेल्या गळामैत्रीचे नवेच रूप त्याने धारण केले आहे. भ्रष्टाचाराने बरबटलेल्या राफेल खरेदी व्यवहाराने अवघ्या देशाच्या विवेकबुद्धीला हादरे दिले आहेत.

राष्ट्रवादी
काँग्रेस पक्ष

राष्ट्रवादी
काँग्रेस पक्ष

# काळाची गरज

भारतीय घटनेचा आत्मा नष्ट करण्याचे प्रयत्न करणाऱ्या शक्तींना आपण पराभूत करण्याची गरज आहे. अशा जटिल आणि अस्थिर परिस्थितीच्या दलदलीतून देशाला बाहेर काढून पुन्हा मार्गस्थ करू शकेल आणि देशासमोरील भविष्यातील संधींचा पुरेपूर फायदा घेऊ शकेल असे अनुभवी आणि निर्णयक्षम राजकीय नेतृत्व असलेल्या खंबीर आणि स्थिर सरकारची आज भारताला गरज आहे.

लोकसभा निवडणूक २०१९ ही भारताचे भवितव्य आणि जगातील आपले स्थान निश्चित करणारी ठरणार आहे तसेच आपल्या आर्थिक सुरक्षिततेचा व भरभराटीचा मार्गही या निवडणुकीत दृग्गोचर होणार आहे. एका मोठ्या नाजूक वळणावर आपण येऊन ठेपलो आहोत.

देशपातळीवर बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा काळ आहे जो आपले भविष्य ठरवणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (एनसीपी) आपल्या सहयोगी पक्षांच्या साथीने गेली अनेक वर्षे केलेल्या भरीव कामगिरीच्या जोरावर आपल्याला नव्याने उभारी घ्यायची आहे. आपल्याला येत्या काळाची आव्हाने स्वीकारावी लागतील आणि देशाच्या दीर्घकालीन हितासाठी उपकारक ठरतील असे कठोर निर्णय घ्यावे लागतील. यासाठी गरज आहे ती हेतूपूर्वक केलेल्या अतूट एकजुटीची.

राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारने देशाचा विश्वासघात केला आहे आणि घटनात्मक संस्थांचा, संघटनांचा गैरवापर केला आहे. हे सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. म्हणूनच एनसीपी आणि सर्वच विरोधी पक्षांनी देशाला वाचविण्याचा निर्धार केला आहे.

एनसीपी हा एक असा पक्ष आहे ज्यामध्ये सध्या देशासमोर असलेले खडतर आणि जटिल प्रश्न सोडविण्याची क्षमता आहे. याचे कारण या पक्षाला लाभलेले अनुभवी आणि द्रष्टे नेतृत्व. आपण सारे एकत्रितपणे देशासमोरील आव्हाने पार करू शकतो आणि आपल्यातील कमतरतेला आपल्या ताकदीमध्ये बदलू शकतो.

देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्बांधणी करण्याप्रती, तिचा कायापालट करण्याप्रती आम्ही कटिबद्ध आहोत. आम्हाला विकासाचा असा एक साचा घडवायचा आहे जो सर्वांच्याच हिताचा असेल.

आओ मिलके देश बनायें

हमारा, आपका हम सबका!

# शेती



आज देशाची शेतीव्यवस्था मोठ्या संकटातून जात आहे. भारतीय जनता पक्ष (भाजप) ने दिलेले 'अच्छे दिन" आणण्याचे वचन केव्हाचे विरून गेले आहे. प्रत्यक्षात, शेतकरी वेदनेने पिचला आहे आणि केवळ शाब्दिक पोपटपंचीवर त्यांची बोळवण केली जात आहे. एनडीए सरकारची शेती क्षेत्रातील कामगिरी अनर्थकारी ठरली आहे.

शेती, वन्य उत्पादन आणि मत्स्योत्पादन क्षेत्रातील उत्पादनांच्या आधारमूल्यावरील ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड (जीव्हीए) मधील वाढ २०१८-१९ मध्ये २.७ टक्क्यांनी घटण्याची चिन्हे आहेत. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ५ टक्के इतके होते. तब्बल ४६ टक्क्यांची ही घट म्हणजे गेल्या १४ वर्षांमधली निच्चांकी घसरण आहे.

देशाच्या शेती क्षेत्रातील उत्पादनामध्ये ऑक्टोबर – डिसेंबर २०१८ च्या तिमाहीमध्ये त्याआधीच्या वर्षातील याच तिमाहीच्या तुलनेत २.७ टक्क्यांची किरकोळ वाढ झाली आहे. गेल्या ११ तिमाह्यांतील ही सर्वात कमी वाढ आहे. यातली चिंताजनक बाब म्हणजे ही निम्न स्वरुपाची वाढही खरीखुरी नाही ( किंमती स्थिर असतानाची) तर नाममात्र स्वरुपातली (चलनवाढीनुसार विद्यमान किमतीत फेरफार केल्याने) आहे.

२००२-०३ ते २०१५-१६ या काळातला कृषी क्षेत्राच्या सकल घरगुती उत्पादनाचा (जीडीपी) एकत्रित सरासरी वाढीचा दर अर्थात कम्पाउंडेड ॲव्हरेज ग्रोथ रेट (सीएजीआर) ३.८ टक्के आहे तर शेती आधारित कुटुंबांच्या उत्पन्नाचा सीएजीआर ३.७ टक्के आहे.

सध्याच्या एनडीए सरकारच्या कारकीर्दीच्या पहिल्या चार वर्षांमध्ये कृषीक्षेत्राच्या सरासरी वार्षिक जीडीपीतील वाढ फक्त २.५ टक्के आहे. वाढीचा हा दर युपीए सरकारच्या शेवटच्या चार वर्षांमध्ये ५.२ टक्के इतका होता.

शेती उत्पादनांच्या निर्यातीने २०१३-१४ साली ४२.५ बिलियन डॉलर्सचा कळस गाठला होता व त्यानंतर हे प्रमाणही घटले आहे. शेती उत्पादनांच्या आयातीचे वाढते प्रमाण चिंताजनक आहे. नेट एक्स्पोर्ट सरप्लस २०१३-१४ साली २५ बिलियन डॉलर्स इतके होते, ते २०१७-१८ मध्ये १० बिलियन डॉलर्सपर्यंत घसरले.

कर्जबाजारीपणा, आत्महत्यांचे वाढते प्रमाण आणि शेतमालाला पुरेशी किंमत न मिळल्याने शेतकरी समुदायावर कुऱ्हाड कोसळली आहे. शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६००० रुपये देण्याचा एनडीए सरकारचा निर्णय खूपच अपुरा आहे. या रकमेतून शेतकऱ्यांचा साधा उत्पादन खर्चही निघू शकत नाही. ही मदत म्हणजे खरेतर दिवसाला जेमतेम १७ रुपये आणि प्रत्येक शेतकऱ्याला ३.५० रुपये इतकीच आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कृषीक्षेत्र विकासाकडे, उत्पादकता, उत्पन्न आणि बाजारपेठेची उपलब्धता वाढविण्याकडे पुरेसे लक्ष देत राहील.

शेतीच्या शाश्वत सुधारणेला गती देण्यासाठी आम्ही संरचनात्मक सुधारणा घडवून आणू.

आम्ही सर्व शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्ती देऊ.

किमान आधारमूल्याला (एमएसपी) लाभांश आणि कमिशन पेमेंट्सच्या यंत्रणेद्वारे पाठबळ दिले जाईल. शेतकऱ्यांना भरपाईची हमी मिळावी यासाठी सर्वंकष दृष्टिकोनातून शक्य ते सर्व प्रयत्न केले जातील.

कृषी उत्पादनांचे वर्गीकरण, प्रतवारी ठरवणे, पॅकिंग, कोल्ड स्टोरेज आणि साठवणूक यांसाठी ग्रामीण भागांतील पायाभूत सुविधांना आम्ही अधिक बळकटी देऊ. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालासाठी अधिक किंमत मिळू शकेल तसेच उत्पादन वाया न गेल्याने होणारे नुकसानही कमी होईल.

शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी तसेच निर्यातीला चालना देण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी (पीपीपी) ला प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न आम्ही करू.

**शेती, वन्य उत्पादन आणि मत्स्योत्पादन क्षेत्रातील उत्पादनांच्या आधारमूल्यावरील ग्रॉस व्हॅल्यू ॲडेड (जीव्हीए) मधील वाढ २०१८-१९ मध्ये २.७ टक्क्यांनी घटण्याची चिन्हे आहेत. २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ५ टक्के इतके होते. तब्बल ४६ टक्क्यांची ही घट म्हणजे गेल्या १४ वर्षांमधली निच्चांकी घसरण आहे.**

छोट्या क्षेत्रफळांवर एकेकट्या शेतकऱ्याकडून केल्या जाणाऱ्या शेतीमध्ये होणारे नुकसान भरून निघावे यासाठी आम्ही सामुहिक शेतीला प्रोत्साहन देऊ. अशाप्रकारे अधिकाधिक उत्पादन घेता येईल व एकेकट्या शेतकऱ्यावरील खर्चाचा भारही कमी होईल.

उत्पादनखर्च कमी व्हावा यासाठी शेतमजुरांना देण्यात येणाऱ्या मजुरीमधील काही भाग नरेगा (NAREGA) तून दिला जाईल.

बागकाम आणि फुलांच्या शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आम्ही आर्थिक मदत आणि प्रत्यक्ष पायाभूत सुविधा पुरवू.

शेतकऱ्यांच्या उत्पन्नास अधिकच्या मिळकतीची जोड मिळावी यासाठी आम्ही कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्योंत्पादन, शेळी पालन, मधमाशी पालन इत्यादी उद्योगांना प्रोत्साहन देऊ.

आम्ही सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देऊ व त्यासाठी बाजारपेठही तयार करू.

आम्ही शेती उत्पादनांवर लागू जीएसटीमधून मोकळीक देऊ.

साखरेच्या अतिरिक्त साठ्यातील साखर किमान प्रमाणात निर्यात करण्याची निकड लक्षात घेऊन केंद्र व राज्य सरकार एकत्रितपणे प्रति किलो ५ रुपये दराने वाहतूक आणि हाताळणीमध्ये साह्य पुरवेल.

आम्ही उसाच्या गाळपासाठी वित्तीय सहकार्य देण्याच्या योजनेची व्याप्ती वाढवू व २०१८-१९ च्या हंगामामध्ये ऊस गाळपावर प्रति क्विंटल ९ रुपयांची वाढीव मदत देऊ.

कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकार देशांतर्गत इथेनॉल उत्पादनाला अधिक प्रोत्साहन देईल आणि बी हेव्ही आणि उसाचा रस यांचे दर वास्तवदर्शी पातळीपर्यंत वाढवेल.

आम्ही शालेय अभ्यासक्रमामध्ये शेती आधारित विभागाचा समावेश करू जेणेकरून देशभरात शेतीविषयी जाणीवजागृती व्हावी व शेतीव्यवसायास प्रोत्साहन मिळावे.

जिथे शेतकरी, वैज्ञानिक, प्राध्यापक, विद्यार्थी, उद्योजक आणि इतर लाभार्थी एकत्रितपणे काम करून शेती व त्याच्याशी संबंधित विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये अनोखी उंची गाठू शकतील अशी एक परिसंस्था आम्ही तयार करू. २००४-२०१४ या कालवधीमध्ये झालेल्या कृषीक्रांतीमुळे शेतीच्या क्षेत्रामध्ये झालेल्या देदिप्यमान वाढीसाठी कारणीभूत ठरणाऱ्या नवनव्या शोधांना पुढे नेण्याचे काम ही मंडळी करू शकतील. त्याचबरोबर देशभरातील मरणासन्न कृषी विद्यापीठांना नवसंजीवनी देण्याकरीता आर्थिक व इतर प्रकारचे पाठबळ आम्ही देऊ.

## आर्थिक विकास



आर्थिक वर्ष २०१९ च्या तिसऱ्या तिमाहीमध्ये भारताचे सकल उत्पन्न (GDP) ६.६ टक्क्यांवर घसरले. पहिल्या तिमाहीमध्ये आपल्या अर्थव्यवस्थेने ८.२ टक्क्यांची तर दुसऱ्या तिमाहीमध्ये ७.१ टक्क्यांची वाढ नोंदवली होती ज्यामुळे पहिल्या सहामाहीमध्ये सरासरी वाढ ७.६ टक्के इतकी राहिली.

कच्चे तेल, रिफायनरी उत्पादने आणि खतांच्या आठ मूलभूत उद्योगक्षेत्रांची वाढ विस्तारामध्ये झालेल्या नकारात्मक वाढीमुळे आठ मूलभूत उद्योगक्षेत्रांमध्ये अवघ्या २.६ टक्क्यांची वाढ झाली.

भांडवली खर्चाच्या आघाडीवर आलेल्या मंदीचा परिणाम होऊन येत्या तिमाहीतील वाढीवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

भारताचा विकासदर २०१९ मध्ये ७.५ टक्के तर २०२० मध्ये ७.७ टक्के टक्के राहील असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. या गतीने दोन आकडी विकासदर गाठण्याची अपेक्षा ठेवणे अशक्य आहे.

निश्चलनीकरणामुळे आर्थिक विकासाची गती मोठ्या प्रमाणात मंदावली आहे व या निर्णयाचा जीडीपीवर लक्षणीयरित्या विपरित परिणाम झाला आहे. निश्चलनीकरणामुळे १ कोटी ८० लाख नोकऱ्या गेल्या आहेत. आम्ही या विषयावर श्वेतपत्रिका प्रसिद्ध करू.

वस्तू व सेवा कराची (जीएसटी) सदोष अंमलबजावणीसुद्धा आर्थिक विकासाची गती खुंटण्यास कारणीभूत ठरली आहे.

या आपत्तीजनक निर्णयाच्या पार्श्वभूमीवर, आपल्यासमोरचे खरे आव्हान असणार आहे ते कोसळत्या अर्थव्यवस्थेला सावरण्याचे आणि भारतीय अर्थव्यवस्थेला विकासाच्या महामार्गावर आणण्याचे, गुंतवणुकीचे चक्र पुन्हा कार्यरत करण्याचे आणि देशी तसेच परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास पुन्हा एकदा संपादित करण्याचे.

आम्ही बृहद् पातळीवर आर्थिक स्थैर्य मिळविण्यास आवश्यक ते प्राधान्य देऊ व संकटात असलेल्या सर्व उद्योगक्षेत्रांना पुन्हा सुस्थापित करण्याकडे पुरेसे लक्ष देऊ.

आम्ही खाजगी गुंतवणुकीवर भर देऊ आणि वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी खाजगी विनिमयाला प्रोत्साहन देऊ.

भारतासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधांच्या उभारणीतून बांधकामाच्या क्षेत्रातही अधिक चांगली वाढ साधली जाईल. यातून अधिकाधिक लोकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि शेतीव्यवसाय सोडून अन्यत्र जम बसविण्याच्या प्रयत्नांत असलेल्यांसाठी नोकऱ्या उपलब्ध होतील.

आम्ही वित्तीय तूट जीडीपीच्या ३ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे लक्ष्य साध्य करू.

**आम्ही वित्तीय तूट जीडीपीच्या ३ टक्क्यांपर्यंत मर्यादित ठेवण्याचे लक्ष्य साध्य करू.**

दोन आकडी विकासदर गाठण्यासाठी अर्थव्यवस्थेमध्ये नवा उत्साह आणि उमेद आणण्यासाठी आम्ही आक्रमक अजेंडा राबवू.

आम्ही खादी आणि ग्रामोद्योगाचे पुनरुज्जीवन करण्याकडे तातडीने लक्ष देऊ व त्यासाठी पुरेसा निधी व बाजारपेठ उपलब्ध करून देऊ. रोजगार निर्माणाची प्रचंड क्षमता बाळगणाऱ्या या उद्योगांसाठी विकासाच्या नवनव्या वाटा शोधण्याचा आमचा प्रयत्न राहील.

सध्या वस्त्रोद्योग क्षेत्र खडतर कालखंडातून जात आहे. आमचे सरकार वस्त्रोद्योगासाठी अधिक सोयीसुविधा देऊ करेल, विद्यमान सोयीसुविधांना बळकटी देईल व वित्तीय पाठबळासाठीचे नवे मार्ग खुले करेल.

हातमाग आणि यंत्रमाग उद्योग खूप मोठ्या लोकसंख्येला रोजगार पुरवितो, मात्र सध्या हे उद्योगक्षेत्र स्वत:च संकटात आहे. या क्षेत्रातील संधींना पाठबळ देण्यासाठी या क्षेत्रांकडे विशेष लक्ष पुरविले जाईल.

# रोजगार निर्मिती



सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआयई)च्या ताज्या आकडेवारीनुसार फेब्रुवारी २०१९ मध्ये भारतातील बेरोजगारीचे प्रमाण ७.२ टक्के झाले. फेब्रुवारी २०१८ मध्ये हेच प्रमाण ५.९ टक्के इतके होते.

नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येमध्ये घट होऊनही बेरोजगारीचा दर वाढता राहिला आहे. वर्षभरापूर्वी देशातील रोजगार असलेल्या व्यक्तींची संख्या ४०.६ कोटी इतकी होती जी फेब्रुवारी २०१९ मध्ये ४० कोटींवर आली.

२०१७-१८ साली भारतातील बेरोजगारीचा दर ६.१ टक्क्यांवर पोहोचून गेल्या चाळीस वर्षांतला उच्चांक गाठेल असे भाकित नॅशनल स्टॅटिस्टिकल सॅम्पल ऑर्गनायझेशन ( एनएसएसओ) ने आपल्या मसुदा अहवालामध्ये केले होते. मात्र एनडीए सरकारने याविषयीची अधिकृत माहिती प्रसारित करणे टाळले, परिणामी या गोष्टीबद्दल काळजी वाटते अशा सत्शील अधिकाऱ्यांनी सरकारच्या या कृतीच्या निषेधार्थ राजीनामे दिले.

देशातील जवळजवळ १ कोटी ८० लाख माणसांनी २०१८ सालात आपल्या नोकऱ्या गमावल्या. सीएमआई

**देशातील जवळजवळ १ कोटी ८० लाख माणसांनी २०१८ सालात आपल्या नोकऱ्या गमावल्या.**

अहवालानुसार नोकरी सुटण्याचे प्रमाण आणि देशातील बेरोजगारांची संख्या या दोहोंमध्येही हळुहळू वाढ होत आहे. नव्या प्रकल्पांची वानवा आणि सरकारने कॅशलेस अर्थव्यवस्था उभारण्यासाठी केलेल्या ढिसाळ प्रयत्नांमुळे रोजगार निर्मितीच्या प्रक्रियेतली खालावलेली लवचिकता या गोष्टी झपाट्याने होत चाललेल्या या रोजगारहानीस कारणीभूत ठरत आहेत. २०१६ साली १५.३ लाख कोटी रुपयांची रोख रक्कम व्यवहारात वापरली जात होती. वास्तविक, कॅशलेस इकॉनॉमीमुळे रोख रकमेच्या वापराचे हे प्रमाण कमी व्हायला हवे होते पण त्याऐवजी ते २२.२ टक्क्यांनी वाढले. कॅशलेस समाजाला प्रोत्साहन देण्यासाठी एनडीए सरकारने केलेल्या तथाकथित गंभीर प्रयत्नांचे हे विडंबनच म्हणायला हवे. सध्या २२ लाख कोटींची रोख रक्कम व्यवहारांत वापरली जात आहे असा एक अंदाज आहे. शिवाय गुंतवणूकदारांच्या विश्वासाला बसलेला मोठा फटका आणि बाजारपेठेत खर्चाचे घटलेले प्रमाण यांमुळे परिस्थिती अधिकच बिकट बनली आहे.

खाजगी गुंतवणूक हा आर्थिक विकासाला तसेच रोजगार निर्मितीला चालना देणारा प्रमुख घटक आहे. यासंदर्भात, आम्ही धोरणात्मक तसेच कररचनेसंबंधीची अनिश्चितता दूर करून देशाला पुन्हा स्पर्धात्मक पातळीवर सक्षम बनवू असा आमचा निर्धार आहे.

आम्ही खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र, शिक्षणक्षेत्र, स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यवर संस्था यांच्या सक्रीय सहभागाद्वारे कौशल्य विकासाला चालना देऊ. बदलत्या वातावरणाशी सुसंगत आणि लाभदायक असे पुरेसे कौशल्य विकास कार्यक्रम आम्ही सुरू करू.

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रामध्ये असलेली रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता लक्षात घेऊन आम्ही या क्षेत्रातील उद्योगांना मिळणाऱ्या वित्तीय सहकार्यांमध्ये वाढ करू तसेच त्यांच्या कर्जपुरवठ्याची फेररचना करू.

भारतामध्ये पारंपरिक उद्योग हे जामनगर, मोरबी, मुरादाबाद इत्यादी विशिष्ट स्थानिक केंद्रांच्या अवतीभोवती वसले आहेत. जिथे हातमाग, यंत्रमाग आणि इतर उद्योग विपुल संख्येने कार्यरत आहेत अशा क्षेत्रांना शोधून त्यांना वित्तीय तसेच पायाभूत सुविधांचे पाठबळ पुरविले जाईल. त्यांच्या उत्पादनांना राष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळेल याची काळजी घेतली जाईल. असे केल्याने स्थानिक रोजगार निर्मितीला चालना मिळेल तसेच स्थलांतराचे प्रमाण कमी होऊन हळुहळू परिसराचा विकासही साधला जाईल.

## सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर (एमएसएमई) भर



एखाद्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) म्हणजे रोजगारसंधींची खाण असतात. एमएसएमई क्षेत्र म्हणजे भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. देशाच्या एकूण औद्योगिक उत्पादनापैकी ४५ टक्के उत्पादन या क्षेत्रामधून मिळते, तर देशाच्या एकूण निर्यातीमध्ये ४०टक्के वाटा याच क्षेत्राचा आहे. सुमारे ९५ टक्के सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे अनौपचारिक उद्योगक्षेत्राचा भाग आहेत. देशातील युवा लोकसंख्येसाठी नोकरीच्या पुरेशा संधी निर्माण करण्यासाठी एक स्पंदनशील, जोमदार एमएसएमई क्षेत्र ही काळाजी गरज आहे.

इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशनच्या अंदाजानुसार एमएसएमईंना ३७० अब्ज डॉलर्सचा वित्तपुरवठा लागतो, मात्र प्रत्यक्षात बँकांकडून या क्षेत्राला केवळ २३० अब्ज डॉलर्सचाच पुरवठा केला जातो. या तफावतीमुळे, या उद्योगांना पैसे उभारण्यासाठी अनौपचारिक स्रोतांकडून महागड्या व्याजदराने कर्जे घ्यावी लागतात.

निश्चलनीकरणाच्या आपत्तीचा एमएसएमईंना सर्वात जबरदस्त तडाखा बसला आहे आणि त्यातील अनेक उद्योग तगून राहण्यासाठी धडपडत आहेत.

एमएसएमई उद्योगक्षेत्राला नवसंजीवनी देणे आणि त्यांना वेगाने विकास साधण्यास मदत करण्यासाठी पायाभूत सुविधांमध्ये सुधारणांची गरज असलेली खास क्लस्टर्स शोधून त्यातील उद्योगांना आम्ही विशेष सोयी-सुविधा पुरवू. या क्षेत्रातील उद्योगांसाठी अर्थसंकल्पात अधिक तरतूद केली जाईल.

एमएसएमईंना औपचारिक उद्योगांच्या परिघात आणले गेल्यास त्यांना कर्ज देणे बँकांसाठी कमी धोक्याचे होईल,

कारण असे उद्योग आपल्या कामकाजाचे दस्तावेजीकरण अधिक चांगले करू शकतील. कर्जपुरवठ्यासाठी डिजिटल कर्जपुरवठा मंचांचा वापर केला जाईल. यामुळे कर्ज घेण्याच्या प्रक्रियेसाठी होणारा खर्च कमी होईल. या उद्योगक्षेत्रांना विशेषत्वाने कर्जवाटप करणाऱ्या छोट्या फायनान्स बँकांना परवाने देण्यात येतील.

उद्योजकता कौशल्यांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि प्रशिक्षित कामगार घडविण्यासाठी स्थानिक महाविद्यालयांमध्ये खास प्रशिक्षण कार्यक्रम घेण्याचा प्रयत्न केला जाईल. तालुकापातळीवर उद्योजक सहाय्यक यंत्रणा उभारली जाईल. युवा भारतीयांना स्किल व्हाउचर्स दिली जातील. ही व्हाउचर्स सरकारी किंवा खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये वापरता येतील.

नियामक बंधने, विशेषत: परवाने, पर्यवेक्षण आणि बंधनकारक कागदपत्रांच्या संदर्भातल्या नियमनांचा भार कमी करण्यात येईल.

विशिष्ट क्लस्टर्समध्ये तयार होणाऱ्या उत्पादनांना प्रोत्साहन मिळावे यासाठी सरकारकडून मार्केटिंगच्या मोहिमा विकसित केल्या जातील. या मोहिमांमुळे या उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याच्या मार्गातील अडथळे दूर होतील.

ई-कॉमर्स मंचांच्या माध्यमातून तसेच स्थानिक स्त्रोतांचा वापर करण्यासंबंधीच्या नियमांद्वारे एमएसएमईंना जागतिक मूल्य साखळीशी जोडून बाजारपेठेपर्यंत पोहोचणेही अधिक सुलभ केले जाईल.

# कामगार कायद्यांत सुधारणा



कामगार कायद्यांतील सुधारणा ही एक किचकट प्रक्रिया आहे पण त्यातून उद्योगांच्या वाढीस लाभ होतो व रोजगार निर्मितीस चालना मिळते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी संघटीत आणि असंघटीत अशा दोन्ही उद्योगांतील कामगार वर्गाला सामाजिक सुरक्षितता प्रदान करण्यास कटिबद्ध आहे.

व्यापारसुलभतेस आणखी प्रोत्साहन मिळावे व नवे गुंतवणूकदार आकर्षित व्हावेत यासाठी आम्ही कामगार कायद्यांमध्ये अर्थपूर्ण सुधारणा घडवून आणण्याचा पाठपुरावा करू. हे करताना कामगारांचे हीत प्राधान्याने जपले जाईल.

आम्ही सरकारी कर्मचाऱ्यांच्या बरोबरीने न्याय्य वेतनाची अंमलबजावणी होईल याची काळजी घेऊ.

कर्मचारी राज्य विमा योजना अर्थात ईएसआयएस अंतर्गत येणाऱ्या हॉस्पिटल्सचे व्यवस्थापन अत्यंत ढिसाळ असून आपल्या पगारातून या योजनेच्या निधीमध्ये योगदान देणाऱ्यांना या सुविधेचा कोणताही फायदा मिळत नाही. ही स्थिती सुधारली जाईल व लाभार्थीना अधिक चांगल्या वैद्यकीय सुविधा खात्रीपूर्वक मिळाव्यात यासाठी या हॉस्पिटल्सना खाजगी हॉस्पिटल्सशी जोडण्यात येईल.

भविष्य निर्वाह निधी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल.

असंघटीत क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षितता मिळावी तसेच न्याय्य वेतनाची हमी मिळावी यासाठी स्वतंत्र मंडळे स्थापन करण्यात येतील.

टेलिव्हिजन आणि चित्रपट उद्योगातील कामगारांना सुरक्षितता आणि वेतनाची हमी मिळावी यासाठी एक स्वतंत्र मंडळ स्थापण्यात येईल. चित्रपट आणि टेलिव्हिजन उद्योगात काम करणाऱ्या बालकांच्या हक्कांसंबंधीच्या नियमांची कडक अंमलबजावणी करण्यात येईल.

बालमजुरीचे समूळ उच्चाटन करण्याप्रती आम्ही बांधील आहोत व अशा मुलांचे योग्य पुनर्वसन करण्यासाठीचे धोरण अमलात आणले जाईल.

वेठबिगारीची प्रथा कागदोपत्री नष्ट झाली असली तरीही देशाच्या अनेक भागामध्ये आजही अशाप्रकारची

मजुरी अस्तित्वात आहे. या प्रथेचे समूळ उच्चाटन करण्याप्रती आम्ही कटिबद्ध आहोत.

सर्व कर्मचाऱ्यांना 'समान काम, समान वेतन" देत लैंगिक समानतेची हमी देण्याप्रती आम्ही कटिबद्ध आहोत.

## कर सुधारणा



अर्थव्यवस्थेला पुन्हा एकदा भरभराटीच्या दिशेने न्यायचे असेल तर कररचनेत योग्य त्या सुधारणा करणे हा त्यातील महत्त्वाचा मुद्दा असणार आहे. आम्ही कररचना अधिक तर्कसुसंगत आणि सुटसुटीत करू तसेच वस्तू व सेवा करातील (जीएसटी) विपरीत बाबी दूर करू. जीएसटी म्हणजे आजवरची सर्वात मोठी करसुधारणा असल्याची प्रौढी मिरवली गेली, मात्र एनडीए सरकारने कार्यान्वयनाच्या बाजूने तसेच तांत्रिक अंगांनेही पुरेसा अभ्यास न करताच ही करसुधारणा अमलात आणल्याने तिची अंमलबजावणी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. सरकारने जीएसटी कराचे मासिक संकलन १ लाख कोटी होईल, असे वारंवार सांगूनही ते अजून शक्य झालेले नाही. परंतु, करबुडवेगिरीने कळस गाठला आहे.

साधेपणा आणि सुस्पष्टता ही आमच्या करपद्धतीची प्रमुख लक्षणे असतील. त्यामुळे कर लागू करण्यामागची तत्वे न्याय्य आणि सुटसुटीत कररचनेच्या संकल्पनेभोवती गुंफली जातील. कर कायदे सहज समजावेत अशा पद्धतीने मांडले जातील.

कोणताही कर पूर्वलक्ष्यी प्रभावाने वसूल केला जाणार नाही.

आम्ही विकासाला पूरक अशा कर संकेताला प्रोत्साहन देऊ.

आम्ही जीएसटीचा एकच किंवा जास्तीत जास्त दोन दर असलेली करपद्धती अमलात आणू, कारण माफक दरांमुळे अधिक चांगल्या प्रकारे नियमपालन होईल अशी अपेक्षा आहे.

२८ टक्क्यांचा स्लॅब फक्त डिमेरीट वस्तूंपुरताच म्हणजे सर्वसाधारणपणे ऐषआरामाच्या वस्तूंपुरताच लागू असावा असा आमचा प्रयत्न राहील.

जीएसटीच्या अंमलबजावणीमागे एक देश- एक कररचना हे सूत्र साध्य करण्याचा हेतू होता. मात्र काही विशिष्ट उद्योगक्षेत्रांमध्ये, विशेषत: हॉटेल आणि बांधकाम उद्योगांमध्ये सध्या दुहेरी करपद्धती लागू आहे जे योग्य नाही. आम्ही ही दुहेरी करपद्धती रद्द करू.

जीएसटीच्या करप्रणालीमध्ये एमएसएमईंना अधिक लाभ दिले जातील.

## भांडवली आणि वित्तीय बाजारपेठा



अनेक नियामक उपाययोजनांमुळे भारतीय भांडवली बाजारपेठा बदलांना सामोऱ्या जात आहेत. बाजारपेठेची नियामक संस्था सेबीने स्टॉक एक्स्चेंज आणि क्लिअरिंग कॉर्पोरेशन रेग्युलेशन्समधील सुधारणांवर शिक्कामोर्तब केल्याने अखेर १ ऑक्टोबर २०१८ पासून युनिव्हर्सल एक्स्चेंजेसचा मार्ग मोकळा झाला. हे पाऊल म्हणजे सेबीने प्राथमिक बाजारपेठ, उत्पादने आणि परदेशी गुंतवणुकदारांसाठी आखलेल्या सुधारणा योजनांचा एक भाग होता.

या नियामक संस्थेने सिक्युरिटी मार्केट्सची खोली वाढविण्यासाठी तसेच काही महत्वाच्या उद्योगक्षेत्रांवरील देखरेखीच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी व एकूणच संपूर्ण व्यवस्थेमध्ये अधिक काटेकोरपणा आणि शिस्तबद्धता आणण्यासाठी काही उपाययोजना जारी केल्या आहेत.

सुधारणांना अशाप्रकारे मिळालेल्या गतीमुळे वित्तीय बाजारपेठ उद्योगातील भविष्यातील धोरणबदलांचा मार्ग मोकळा झाला आहे.

या सुधारणांची आक्रमक अंमलबजावणी केली जाईल, जेणेकरून वित्तीय बाजारपेठांना, विकासाला गती देणाऱ्या इंजिनांच्या रूपात आपल्या सेवा पुरवता याव्यात.

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या कारभारावरील बंधने दूर करण्यासाठी व वित्तीय संस्थांच्या समस्यानिवारणाची चौकट स्थापित करण्यासाठी विद्यमान कायदे आणि नियमांचे पुनरावलोकन केले जाईल.

# मानव संसाधन विकास



‘जितके हात तितके काम;जितके काम तितका विकास 9 या तत्वाचा आम्ही पाठपुरावा करू.

जगभरामध्ये प्रशिक्षित कुशल मनुष्यबळाची कमतरता असली तरीही आपल्या देशाच्या लोकसंख्येतील मोठा गट हा कार्यक्षम वयोगटातील आहे, जो मनुष्यबळाची वाढती मागणी पूर्ण करू शकतो. ही मागणी पूर्ण करण्यासाठी या वयोगटाला प्रशिक्षण देण्यास प्राधान्य दिले जाईल.

भारत हा तरुणांचा देश आहे; शिक्षणव्यवस्थेत नवे बदल घडवून आणत त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

रोजगारक्षमतेशी जोडलेल्या संपूर्ण साक्षरतेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आम्ही सर्वसमावेशक योजनेची आखणी करू. यात विद्यार्थी आणि बिगर-सरकारी संस्थांसह सर्व लाभार्थींचा सक्रीय सहभाग असेल.

सामाजिक सक्षमीकरणाप्रमाणेच शैक्षणिक सक्षमीकरणाचा पाठपुरावा करण्याचा एनसीपीचा प्रामाणिक प्रयत्न असेल. रोजगार निर्मितीमध्ये व त्यायोगे अर्थव्यवस्थेला नवी उंची गाठण्यास मदत करण्याच्या कामी या प्रयत्नांची महत्वाची भूमिका असेल.

विद्यापीठांना डिजिटल माध्यमाने जोडून त्यांचा संघ स्थापन केला जाईल, जिथे ज्ञान आणि शिकविण्याच्या पद्धतींची देवाणघेवाण व वैश्विकीकरण साधले जाईल. कोणत्याही एका विद्यापीठामध्ये संसाधने आणि शिक्षकवर्गाच्या रूपात उपलब्ध ज्ञान व कुशलता डिजिटल माध्यमातून कोणत्याही इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाईल. भाषेची दरी मिटविण्यासाठी प्रशिक्षण साहित्याचे डबिंग किंवा भाषांतर केले जाईल.

**विद्यापीठांना डिजिटल माध्यमाने जोडून त्यांचा संघ स्थापन केला जाईल, जिथे ज्ञान आणि शिकविण्याच्या पद्धतींची देवाणघेवाण व वैश्विकीकरण साधले जाईल. कोणत्याही एका विद्यापीठामध्ये संसाधने आणि शिक्षकवर्गाच्या रूपात उपलब्ध ज्ञान व कुशलता डिजिटल माध्यमातून कोणत्याही इतर विद्यापीठातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाईल. भाषेची दरी मिटविण्यासाठी प्रशिक्षण साहित्याचे डबिंग किंवा भाषांतर केले जाईल.**

सर्वसाधारण तसेच तंत्रशिक्षण आणि संशोधनातील गुंतवणूक वाढविण्याकडे लक्ष दिले जाईल.

शैक्षणिक ज्ञानाची नोकऱ्यांच्या बाजारातील उपयुक्तता वाढावी यासाठी शिक्षण केवळ माहिती पुरविण्यापुरते मर्यादित न ठेवता कृती आधारित केले जाईल. सर्व प्रकारच्या जीवनावश्यक कौशल्यांचे शिक्षण पुरविण्याची काळजी घेतली जाईल.

तंत्रशिक्षणाच्या क्षेत्रामध्ये अधिक आश्वासक अभ्यासक्रमांची भर टाकण्यात येईल तसेच शॉप फ्लोअर वर्क इंडस्ट्रीजमध्ये नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने तयारी करवून घेणारे अभ्यासक्रमही उपलब्ध केले जातील.

देशाची बदलती जीवनशैली आणि पर्यावरणाला साजेशा अशा नव्या उदयोन्मुख व्यवसायांना अभ्यासक्रमात सामावून घेतले जाईल. डिझाइनिंग, फिजिकल ट्रेनिंग, न्यूट्रिशन (आहारतज्ज्ञ), समुपदेशन, निमवैद्यकीय सेवा कर्मचारी इत्यादींसारख्या अपारंपरिक कार्यक्षेत्रांसाठी शैक्षणिक अभ्यासक्रम सुरू करण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल.

आजवर दुर्लक्षित राहिलेल्या पूर्व-प्राथमिक शिक्षणावर भर दिला जाईल. सरकारकडून सहा वर्षांखालील मुलांसाठी अर्ली चाइल्ड एज्युकेशन (इसीई)चे नवे धोरण आखले जाईल.

एकही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शिक्षणहक्क कायद्याची (आरटीई) नव्याने अंमलबजावणी केली जाईल. आरटीईच्या मूळ ध्येयाबरहुकूम प्रत्येक मुलाला शिक्षणापासून केवळ सांगण्यापुरता नव्हे तर खरोखरीचा लाभ व्हावा यासाठी पाठबळ दिले जाईल. या कायद्याखाली येणाऱ्या मुलांची वयोमर्यादा १८

वर्षांपर्यंत वाढवली जाईल.

सर्व अभ्यास साहित्य डिजिटलाइज्ड केले जाईल व देशभरातील सर्व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले जाईल. हे साहित्य स्थानिक भाषांमध्येही उपलब्ध करून दिले जाईल.

## डिजिटल भारत



भारतीय आयटी क्षेत्राने सुमारे ४.१ दशलक्ष जणांना रोजगार दिला आहे. २०१८-१९ च्या वित्तीय वर्षात यापैकी १,७०,००० जणांची भर पडली आहे.

भारतामध्ये डिजिटल कुशलतेचे प्रमाण सर्वाधिक म्हणजे ७६ टक्के आहे. ५६ टक्क्यांच्या जागतिक सरासरीच्या तुलनेत हे प्रमाण जास्त आहे. जागतिक स्तरावरील स्टार्ट अप परिसंस्थेमध्ये २२०० स्टार्ट अप्स असलेल्या भारताचा क्रमांक तिसरा आहे. आयटी उद्योगक्षेत्राने देशात घडून येत असलेल्या आर्थिक परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे.

देशातील तरुणांना डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी आवश्यक ती कौशल्ये देण्यासाठी आम्ही सर्वसमावेशक धोरण अमलात आणू.

भविष्यलक्ष्यी तंत्रज्ञानाच्या क्षेत्रांतील प्रगतीसाठी आम्ही मान्यवर संस्थांच्या सहयोगाने जागतिक भागीदारीवर भर देऊ.

भविष्यात उपयोगी ठरणाऱ्या कौशल्यांशी जुळवून घेण्यासाठी अभ्यासक्रमांची व्याख्या नव्याने तयार करू.

नव्या तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये संशोधन, पीएचडी करणाऱ्यांना व अभ्यासूंना पाठबळ दिले जाईल.

व्यापार करणे अधिक सुलभ व्हावे यासाठी आम्ही सरकारद्वारे मागविल्या जाणाऱ्या नव्या तंत्रज्ञानांची व कार्यपद्धतींची व्याख्या नव्याने घडवू.

नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच समावेशकतेसाठी आम्ही काटेकोर डेटा धोरणाची अंमलबजावणी करू.

आर्थिक वाढीला पाठबळ देण्यासाठी, कम्प्लायन्सची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी व पारदर्शकतेला प्रोत्साहन देण्यासाठी एक आधुनिक थेट टॅक्स कोड आणला जाईल.

## आरोग्याचा हक्क



राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २०१५-१६ च्या फेरीमध्ये ५.७ लाख घरांची नमुना पाहणी केली गेली. या पाहणीतून असे आढळून आले की सरकारी आरोग्य सेवांचा लाभ घेतला न जाण्यामागे आरोग्य केंद्रांमध्ये मिळणारी सुमार दर्जाची सेवा, आरोग्य सेवा घराच्या जवळपास उपलब्ध नसणे आणि उपचारासाठी लांब रांगा लावाव्या लागणे ही सर्वाधिक आढळणारी कारणे आहेत.

भारताच्या आरोग्य क्षेत्रातील विद्यमान आरोग्य सुविधांमध्ये १.५ लाख सब सेंटर्स (एससी), २५००० प्राथमिक आरोग्य केंद्रे (पीएचसी), ५,६०० कम्युनिटी हेल्थ सेंटर्स (सीएचसी) आणि ७६० जिल्हा रुग्णालये (डीएच) यांचा समावेश आहे. वेगाने वाढणाऱ्या लोकसंख्येसाठी या सुविधांची संख्या अपुरी आहे.

वैद्यकीय सुविधांसाठी रुग्ण जिथे प्रथम संपर्क साधतात अशा आरोग्य केंद्रांची स्थिती भक्कम करून आरोग्य सेवा वितरण पद्धतीवर आम्ही भर देऊ.

हॉस्पिटल्स सुरू करण्यासाठी व त्यायोगे ग्रामीण-शहरी भागांतील असमानता दूर करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारीला (पीपीपी) प्रोत्साहन दिले जाईल.

सरकारी हॉस्पिटल्सचे आधुनिकीकरण केले जाईल जिथे मोफत औषधे पुरविली जातील.

प्रत्येक जिल्ह्यामध्ये सुपर स्पेशॅलिटी, विशेषत: ऑन्कोलॉजी (कॅन्सर) उपचारांसाठीच्या सुविधा असलेले मेडिकल कॉलेज असेल. यामुळे प्रमाणित सुपरस्पेशॅलिटी सेवा ग्रामीण जनतेपर्यंत अधिक मोठ्या प्रमाणात पोहोचतील.

देशभरातील रुग्णांना अधिक फायदा व्हावा यासाठी नवे शोध, टेली मेडिसिन आणि डिजिटल माध्यमांचा वापर करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

आरोग्याच्या हक्काची हमी देणारा एक कायदा आम्ही अमलात आणू ज्यायोगे देशातील सर्वसामान्य जनतेला अधिक चांगल्या आरोग्य सुविधा पुरविल्या जातील.

आम्ही आयुर्वेद, युनानी, होमियोपथी या शाखांचा वैज्ञानिक ज्ञानशाखा व व्यवसाय म्हणून पुरस्कार करू व त्यांना प्रोत्साहन देऊ.

**प्रत्येक जिल्ह्यामध्ये सुपर स्पेशॅलिटी, विशेषत: ऑन्कोलॉजी (कॅन्सर) उपचारांसाठीच्या सुविधा असलेले मेडिकल कॉलेज असेल. यामुळे प्रमाणित सुपरस्पेशॅलिटी सेवा ग्रामीण जनतेपर्यंत अधिक मोठ्या प्रमाणात पोहोचतील.**

## महिला आणि बाल कल्याण



महिला आणि बाल कल्याण हे भारताच्या भविष्यातील विकासाचे दोन प्रमुख आधारस्तंभ आहेत.

एकूण लोकसंख्येमध्ये महिला आणि मुलांचे प्रमाण ६४ टक्के आहे.

अँटे नॅटल केअर (प्रसूतीपूर्व देखभाल), नॅटल केअर (प्रसूतीसमयी), पोस्ट नॅटल (प्रसूती नंतरची देखभाल), स्तनपान, लसीकरण आणि पोषण यांच्या बाबतीत वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात झालेल्या नव्या संशोधनांचे निष्कर्ष ध्यानात घेऊन त्यानुसार या सेवांमध्ये सुधारणा केल्या जातील. माता व बाल आरोग्याशी संबंधित वैद्यकीय सेवांच्या सर्व बाजू अधिक बळकट केल्या जातील.

कुपोषण, विशेषत: मुले, किशोरवयीन मुली आणि गरोदर व स्तनपान देणाऱ्या माता यांच्यातील कुपोषणावर सरकार लक्ष केंद्रित करेल.

महिलांमध्ये आढळणारा पंडूरोग दूर करण्याचे काम प्राधान्यक्रमाने हाती घेतले जाईल.

## बालसुरक्षा आणि महिला सक्षमीकरण



पुरातन सामाजिक प्रथा, लैंगिक हिंसाचार आणि देह व्यापार व तस्करी या प्रश्नांमुळे आजही महिलांची स्थिती शोचनीय आहे.

या आघाडीवर विद्यमान सरकारची कामगिरी खेदजनक आहे. तरुण मुलींवर होणाऱ्या अत्याचारांमध्ये झालेली वाढ ही गंभीर चिंतेची बाब आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी अमलात आणलेल्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या प्रमुख योजनेचा सरकारकडून मोठा गाजावाजा करण्यात येऊनही ही परिस्थिती बदललेली नाही.

इतकेच नव्हे तर हुंड्यासाठी छळ, हल्ले, बलात्कार आणि अपहरणासारख्या महिलांविरोधातल्या गुन्ह्यांमध्येही मोठी वाढ झाली आहे.

महिलांसाठी समान संधी हा आणखी एक मुद्दा आहे, कारण आजही बहुसंख्य स्त्रिया लिंगाधारित समाजविभागणीने लादलेली भूमिका पार पाडताना दिसतात. ज्यामुळे त्यांना घराच्या चौकटीत अडकून पडावे लागत आहे.

विविधांगी उपाययोजनांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण साधता येईल.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण मिळावे, यासाठी कटिबद्ध आहे.

आम्ही तरुण मुलींसाठी शिक्षणाची दारे खुली करू. मुली आणि महिलांना आवश्यक ती कौशल्ये दिली

जातील. महिलांनी आपल्या पायांवर उभे राहावे यासाठी पोषक वातावरण तयार केले जाईल.

याशिवाय महिलांना राजकीय वर्तुळामध्ये समसमान संधी मिळेल याकडे लक्ष देत त्यांचे सामाजिक सक्षमीकरण, राजकीय सक्षमीकरण साधले जाईल.

बालकांची सुरक्षा आणि हिंसामुक्त बालपण यांसाठी सरकार पाठबळ पुरवेल. बाललैंगिक कृत्ये विरोधी संरक्षण कायद्याच्या (पोस्को) अंमलबजावणीसाठी अधिकचे मनुष्यबळ आणि संसाधने पुरविली जातील. बाल कल्याण आणि विशेष गरजा असलेल्या मुलांसाठी तसेच देखभाल व सुरक्षेची गरज असलेल्या मुलांसाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केली जाईल.

## युवा आणि क्रीडा



देशातील ६०० दशलक्ष जनता, म्हणजे भारताची अर्ध्याहून अधिक लोकसंख्या ही २५ वर्षे वयाखालील आहे. असे असले तरीही देशाच्या एकूण मनुष्यबळापैकी जेमतेम २.३ टक्क्यांना रीतसर कौशल्य प्रशिक्षण मिळते तर एकूण पदवीधरांपैकी पाच टक्क्यांहूनही कमी जणांना शिक्षण पूर्ण केल्यानंतर नोकरी मिळते.

सध्या देशातील विद्यार्थ्यांमध्ये संपूर्णतः दुर्लक्षिले जाण्याची भावना आहे कारण त्यांचे प्रश्न सरकारच्या प्राधान्यक्रमामध्ये नाहीत. परीक्षेच्या निकालांना होणारा विलंब, फी भरता न आल्याने कॉलेजचे शिक्षण अर्धवट सोडून द्यावे लागण्याची शक्यता आणि यंत्रणेची समज नसल्यामुळे येणारी हतबलतेची भावना अशा कितीतरी प्रश्नांशी देशाचा युवावर्ग झगडत आहे.

सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळावी यासाठी सर्व प्रयत्न केले जातील.

आम्ही शहरी भागांतील पदवीधर तरुणांना १०० दिवसांच्या नोकरीची हमी देऊ.

आम्ही मुलींना शिशुवर्गापासून ते पदव्युत्तर शिक्षणापर्यंतचे सर्व शिक्षण मोफत पुरवू.

विद्यार्थी आणि युवा संघटनांशी योग्य ती चर्चा करून आम्ही विद्यार्थी हक्क आयोग बसवू जेणेकरून परीक्षांच्या तारखा जाहीर करण्यास किंवा निकाल घोषित करण्यास होणाऱ्या विलंबासारखे प्रश्न सोडविले जातील.

स्थानिक पालिकांमध्ये तरुणांना खात्रीने प्रतिनिधीत्व दिले जाईल.

जागतिक दर्जाचे क्रीडा विद्यापीठ स्थापन केले जाईल.

अर्थसंकल्पामध्ये खेळांसाठी अधिक मोठी तरतूद केली जाईल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विजेतेपद मिळविणाऱ्या खेळाडूंना ते खेळात सक्रीय असेपर्यंत मासिक भत्ता दिला जाईल.

## ज्येष्ठ नागरिक



लोकसंख्येचा विचार केला तर भारत हा एक तरुण देश आहे. मात्र, हा देश हळुहळू वृद्धत्वाकडे मार्गक्रमण करीत आहे. २०५० सालापर्यंत प्रत्येक पाचवी भारतीय व्यक्ती ६०च्या पलिकडे असेल. आता हे प्रमाण अवघे पाच आहे. म्हणजेच, ज्येष्ठ नागरिकांची लोकसंख्या पाहता आपण विकसित देशांच्या बरोबरीला असू.

करसवलतींबरोबरच वयाची सत्तरी पार केलेल्या, शारीरिक दृष्ट्या अपंग आणि अशक्त नागरिकांसाठी बँकिंग सेवा आपण त्यांच्या दाराशी नेणार आहोत. ज्येष्ठ नागरिकांची मंडळे आणि वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी वर्षातून एकदा मोफत वैद्यकीय शिबीरे आणि औषधांचा पुरवठा केला जाईल.

नोंदणीकृत ज्येष्ठ नागरिक संस्थांना आरोग्यासाठी आवश्यक अशी साधने आणि उपकरणे विकत घेण्यासाठी वर्षाकाठी २५००० रुपये देण्यात येतील.

## संरक्षण



लष्करी दलांचे वेगवान आधुनिकीकरण आणि त्यांना अद्ययावत करणे यास प्राधान्य देण्यात येईल. देशातच आधुनिक आणि अद्ययावत शस्त्रे आणि दारुगोळा तयार करता यावा यासाठी हिंदुस्थान ॲरोनॉटिक्स लिमिटेड (एचएएल) आणि इतर शस्त्रास्त्र कारखान्यांनाही अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज करण्यात येईल.

लष्कराशी संबंधित सर्व खरेदी व्यवहारांमध्ये उच्च पारदर्शकता असेल, याची आम्ही खातरजमा करू.

वन रँक वन पेन्शन म्हणजेच ओआरओपी योजना राबवली जाईल, याची आम्ही खातरजमा करू आणि त्यासंदर्भात त्रुटी, तक्रारींवर मार्ग काढू.

सीआरपीएफ आणि इतर निमलष्करी दलाचा त्याग, त्यांचे बलिदान हे नियमित लष्करी दलाच्या पातळीवरच गणले जाईल.

निवृत्त कर्मचारी आयोग (एक्स सर्विसमन कमिशन) नेमण्यात येईल.

## राष्ट्रीय सुरक्षा



वर्षानुवर्षांचा विद्रोह, दहशतवाद आणि अतिरेकी कारवाया अशा आंतरराष्ट्रीय सीमांवरील समस्या आणि देशाातच असलेली अनेक आव्हाने, धोके यात सध्या भारत पिचून निघतोय. त्यातच, धार्मिक दहशतवाद हा भारताच्या सार्वभौमिकतेला आणि एकात्मतेला एक मोठा धोका, एक मोठे आव्हान ठरू पाहतोय.

सीमेपलिकडून होणारी घुसखोरी आणि बेकायदेशीर स्थलांतर हा देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेसाठी एक मोठा धोका निर्माण होत आहे.

काश्मीरमधील तरुण मोठ्या प्रमाणावर दहशतवादाकडे वळत आहेत. ही आणखी एक चिंतेची बाब आहे. जम्मू आणि काश्मीरमधील कायदा आणि सुव्यवस्थेला सुरुंग लावण्यासाठी दहशतवादी स्थानिक तरुणांना कसे आमिष दाखवून भुलवतात, हे नुकत्याच झालेल्या पुलवामा हल्ल्यातून स्पष्ट झालेच आहे. या तरुणांना मुख्य प्रवाहात आणणे आणि पर्यायाने त्यांना या कहरवादाला बळी पडण्यापासून रोखणे, यावर आमचा भर असेल. तरुणांना यात ओढू पाहणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.

**या तरुणांना मुख्य प्रवाहात आणणे आणि पर्यायाने त्यांना या कहरवादाला बळी पडण्यापासून रोखणे, यावर आमचा भर असेल. तरुणांना यात ओढू पाहणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई केली जाईल.**

गेल्या पाच वर्षांत दहशतवादाचा सामना करण्यात एनडीए सरकार पूर्णपणे अपयशी ठरले आहे. या पाच वर्षात, एनडीए सरकारच्या काळात, दहशतवाद्यांनी सरकारच्या नाकावर टिच्चून लष्कर आणि निमलष्करी दलावर तीन दहशतवादी हल्ले केले. हे हल्ले रोखण्यात गुप्तचर विभागाला आलेले अपयश हा एक सरकारचा गुन्हाच आहे. कोणीही जबाबदारी घेत नाही. कोणालाही जबाबदार ठरवले जात नाही.

युपीए सरकारच्या दुसऱ्या कारकीर्दीत युद्धविरामाचे जितक्या वेळा उल्लंघन झाले त्याच्या तब्बल सहा पट गेल्या पाच वर्षात झाले. युपीए सरकारच्या दुसऱ्या टर्मच्या तुलनेत आता दुप्पट दहशतवादी हल्ले झाले. इतकेच नाही, दुर्दैवाने, याआधीच्या सरकारच्या पाच वर्षांच्या काळाच्या तुलनेत मागील पाच वर्षांत आपण दुप्पट सैनिक गमावलेत.

आम्ही राष्ट्रीय सुरक्षेसाठी बांधील आहोत.

युपीएच्या काळात भारतात शांततापूर्ण वातावरण होते आणि कमी मनुष्यहानी होत होती.

मात्र, आपली राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी एनडीए सरकारने ही शांतता भंग केली.

# परराष्ट्र धोरण



आपले राष्ट्रीय धोरण आणि आपल्या विविध शेजारी राष्ट्रांसोबत असलेले आपले परराष्ट्र धोरण हे एकमेकांसोबत गुंतलेले असते. शेजारी राष्ट्रांसोबतच्या संबंधांचा फार मोठा परिणाम आपल्या राष्ट्रीय धोरणांवर होत असतो. त्यामुळे, नेपाळसोबत आहेत तसे किमान बरे, भूतानसोबत आहेत तसे चांगले आणि बांगलादेश आणि मालदीवसोबत विकसित होत आहेत तसे संबंध टिकवून ठेवणे फार गरजेचे असते. मात्र, पाकिस्तानच्या बाबतीत या संबंधांना तडा गेला आहे.

या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी काही तत्वे आखली होती. मात्र, सध्याचे सरकार या तत्त्वांपासून फारकत घेत असल्याने परराष्ट्र धोरणांमध्ये ही अंदाधुंदी माजली आहे. आपल्या सर्वांच्या भल्यासाठी असलेले पंचशील तत्त्वज्ञान आम्ही अंगिकारणार आहोत.

चीनसोबत किमान संबंध टिकवून ठेवणे गरजेचे आहे. आखाती देशांसोबत भारताचे संबंध उत्कृष्ट आहेत. इतके की यूएईने दहशतवादी आणि व्हाईट कॉलर गुन्हेगारांनाही भारताच्या हवाली केले. तसेच, सातत्याने शस्त्रपुरवठा करणे आणि सध्याच्या उपकरणांची देखभाल यासाठी साह्य पुरवणाऱ्या रशियासोबतचे संबंधही पुनरुज्जीवित करणे आवश्यक आहे.

आम्ही पाकिस्तानसोबत पुन्हा एकदा चर्चेला वाट मोकळी करू आणि त्यात दहशतवाद हा मुख्य मुद्दा असेल.

बांगलादेशातील नवनिर्वाचित शेख हसिना सरकारसोबतही आम्ही चांगले संबंध कायम ठेवू.

सातत्याने उच्च स्तरीय आदानप्रदानांमधून रशियाची चीन आणि पाकिस्तानसोबत अधिक जवळीक होऊ नये, यासाठी आम्ही रशियाला त्यांच्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न करू.

चीनसाठी आम्ही चर्चेचे सर्व मार्ग खुले ठेवू. मात्र, त्यांनी भारतीय औषधे, कृषी उत्पादने आणि आयटी सेवांसाठी आपली बाजारपेठ खुली करावी, ही आमची मागणी असेल.

युनायटेड स्टेट ऑफ अमेरिकेसोबतही आम्ही चांगले संबंध कायम ठेवू, अगदी संरक्षण साधनांच्या आयातीच्या मुद्यावरही.

# व्यापारी धोरणे



जगभरात उद्योगक्षेत्रात चढाओढीचे युद्ध सुरू असताना आम्ही व्यवसायात समानता आणणारे यशस्वी धोरण राबवू. प्रामाणिकपणाचे आमचे तत्व आणि त्यासंदर्भातील बांधिलकी जपणाऱ्या इतर राष्ट्रांसोबत व्यवसाय करारांना प्राधान्य देण्यात येईल. शिवाय, आमच्या व्यावसायिक आणि व्यापारी धोरणांमध्ये पारदर्शकता असेल.

# नागरी विकास



शाश्वतता, सर्वसमावेशकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि सुयोग्य शासन ही तत्वे अंगिकारणाऱ्या समग्र दृष्टीकोनासह शहरांचा विकास करण्यात येईल. यामुळे, या शहरांमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी सुखकर जगणे आणि आरोग्यदायी वातावरण असेल याची खात्री नागरिकांना मिळू शकेल.

आम्ही सहभागावर आधारित प्रशासनाला प्रोत्साहन देणार आहोत.

शहरे म्हणजे विकासाचे इंजिन असतात. शहरात राहणाऱ्या नागरिकांच्या रोजगार संधी आणि इतर उद्योजकता उपक्रमांसंदर्भात काही महत्त्वाकांक्षा असतात. प्रत्येक शहरातील अशा संभाव्य संधीच्या जागा आणि क्षेत्रे शोधून या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

परवडणारी घरे, पायाभूत सोयीसुविधा आणि नागरी सुविधा बळकट करणे, सार्वजनिक वाहतूक सेवेचे सुयोग्य आणि कार्यक्षम जाळे निर्माण करणे, मुलांसाठी योग्य अशा शहरांची उभारणी, महिलांसाठी सुरक्षित शहर आणि ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने जगता येईल याची खात्री आमचा पक्ष देत आहे.

शहर स्वच्छ ठेवण्यासोबतच तिथे सौंदर्यदृष्टी, कला, संस्कृती आणि खेळाला महत्त्व दिले जाईल, याची खातरजमाही आम्ही करणार आहोत.

## ग्रामीण विकास आणि पंचायत राज



आरोग्य, शिक्षण आणि पायाभूत सोयीसुविधा देऊ करणे हे आमच्या प्राधान्यक्रमावर असेल.

पंचायत राज पद्धतीमध्ये मनुष्यबळाच्या सक्षमतेवर भर देण्याचे प्रयत्न केले जातील.

प्राथमिक शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी खास उपक्रम राबवला जाईल.

कुपोषणाच्या निर्मूलनासाठी मोहीम राबवली जाईल.

ग्रामीण भागातील लोकांच्या सुरक्षिततेसाठी स्वच्छता आणि पिण्याचे स्वच्छ व सुरक्षित पाणी पुरवण्यावर योग्य लक्ष दिले जाईल.

ग्रामीण भागात नियोजित पद्धतीने कनेक्टिव्हिटी आणि वीज पुरवठा केला जाईल.

## वाहतूक



भारतीय रेल्वेचे आधुनिकीकरण, जुन्या पायाभूत सुविधांना बळकटी आणि रेल्वे मार्गांवरील क्रॉसिंग बंद करण्यास आम्ही बांधील आहोत.

वेग वाढवण्यासाठी नवे तंत्रज्ञान वापरले जाईल.

आम्ही रेल्वे स्टेशनांचे नूतनीकरण करू.

अंतर्गत जलवाहतुकीला चालना देण्यात येईल.

महत्वाच्या शहरांना हवाई वाहतुकीच्या फेऱ्या वाढवून जोडले जाईल. सर्व जिल्ह्यांमधील विमानतळांना रस्ते आणि रेल्वेने जोडले जाईल.

चालक आणि क्लीनरसाठीही विम्याची तरतूद असावी यासाठी मोटर व्हेइकल कायद्यामध्ये बदल केले जातील.

वाहनांच्या नोंदणी क्रमांकाला नंबर पोर्टेबिलिटीची सोय देण्यात येईल.

## पर्यावरण



नद्या या आपल्या देशाच्या जीवनवाहिन्या आहेत. नद्यांचे पाणी प्रदूषणमुक्त असावे, याची खातरजमा आम्ही करू.

नद्यांचे पाणी वाया न घालवता ते सिंचनासाठी आणि पिण्यासाठी वापरले जाईल यासाठी आम्ही प्रयत्न करू.

वने आणि नैसर्गिक स्रोतांच्या संवर्धनासाठी आम्ही बांधील आहोत.

कार्बन उत्सर्जनासंदर्भात आम्ही जनजागृती करू आणि ते कमी करण्यास प्रोत्साहन देऊ.

# सामाजिक न्याय



घटनेतील तरतुदीचे संरक्षण असलेल्या अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणावर टाच आणण्याचा छुपा अजेंडा सध्याचे एनडीए सरकार राबवत आहे. त्यांचे हे सर्व प्रयत्न आम्ही हाणून पाडू.

अनुसूचित जमातींना ‘मुख्य प्रवाहात“ आणण्याचे ढोंग रचून त्यांची प्राचीन संस्कृती नष्ट करण्याचा डाव रचला जात आहे. त्यांच्या प्राचीन आणि पुरातन संस्कृतीला जतन करत या जमातींचा विकास साधण्यास आम्ही बांधील आहोत.

रोहित वेमुलाच्या प्रकरणासह दलित विद्यार्थ्यांना वाईट वागणूक दिल्याच्या, त्यांना त्रास दिल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. दलितांना शिक्षण मिळावे, त्यांचा विकास व्हावा अशी परीसंस्था निर्माण करण्यास आम्ही बांधील आहोत.

आम्ही मंडल आयोगाच्या अंमलबजावणीला पाठिंबा दिला होता. इतर मागासवर्गीय समाजाच्या विकासास आम्ही बांधील आहोत.

महाराष्ट्रात युपीए सरकारने अनुसूचित जाती आणि जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात त्यांच्यासाठी तरतूद केली होती. आताही तसेच केले जाईल. अर्थसंकल्पातील हा निधी संपूर्णपणे याच कारणासाठी वापरला जाईल. हा निधी इतरत्र वळवला जाणार नाही.

आदिवासी बहुल जिल्ह्यांना अतिरिक्त निधी देऊन त्यांना प्राधान्यक्रमावर आणले जाईल. आदिवासींना त्यांच्या जमिनीच्या मालकीसंदर्भात कायदेशीर संरक्षण देण्यात येईल.

# अल्पसंख्याक



धार्मिक अल्पसंख्याक समुदायावर होणाऱ्या हल्ल्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. धर्माच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या द्वेषपूर्ण गुन्ह्यांमध्ये मुख्यत: दलित, मुसलमान आणि ख्रिस्ती नागरिकांना लक्ष्य केले जाते. या घटनांमध्ये २०१४ पासून प्रचंड वाढ झाली आहे. अशा घटना टाळण्यासाठी फारसे प्रयत्नही झाले नाहीत. सातत्याने वाढणारी धार्मिक तेढ रोखण्यासाठी काहीही केले गेले नाही. इतकेच नाही तर, सरकारी यंत्रणाचा पूर्ण पाठिंबा असल्याने अशा दुष्ट शक्तींना या कृत्यांसाठी मोकळे मैदान मिळाले आहे.

अल्पसंख्याकांचे हीत जपण्यास आम्ही बांधील आहोत. हिंसा थांबवण्यावर विशेष लक्ष दिले जाईल आणि दोषींना शिक्षाही केली जाईल. हिंसेच्या प्रकरणांचा ठराविक कालमर्यादेत छडा लावला जाईल आणि विशेष न्यायालयात त्यांची सुनावणी होईल.

युपीए सरकारने सच्चर आयोग नेमला होता आणि त्यांच्या सुचनांचे पालन करण्यास आम्ही बांधील आहोत. समान संधी आयोग म्हणजेच इक्वल अपॉर्च्युनिटी कमिशनची स्थापना करण्यात येईल. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण हा आमच्या सरकारसाठी महत्त्वाचा मुद्दा असेल.

शाळेसाठी कापावे लागणारे अंतर हा शिक्षणातील फार मोठा अडथळा आहे. त्यामुळे, स्थानिक पातळीवर शिक्षणाला चालना देण्याचे प्रयत्न सरकारतर्फे केले जातील आणि स्थानिक पातळीवरील शिक्षणासाठी आर्थिक साह्य दिले जाईल.

अल्पसंख्याक समाजातील प्रत्येक मुलीला शिक्षण मिळावे यासाठी अनुक्रमे दहावी, बारावी आणि पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या मुलीच्या कुटुंबियांना विशेष लाभ दिले जातील.

अल्पसंख्याक, विशेषत: मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी छोट्या आणि मोठ्या शहरांमध्ये हॉस्टेल उभारण्यासाठी खास कार्यक्रम राबवला जाईल.

अल्पसंख्याकांसाठी संस्था उभारण्यासाठी विशेष साह्य पुरवले जाईल.

वक्फ बोर्डाला कायदेशीर अधिकार दिले जातील. तसेच, विशेष निवासी शाळा आणि सरकारी रुग्णालयांना समाजाच्या या कमकुवत गटाला सेवा देता याव्यात यासाठी प्रोत्साहन दिले जाईल.

अल्पसंख्याक बहुल विभागात जीवनाचा दर्जा वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले जातील. त्यांची जीवनशैली बदलण्यासाठी पायाभूत सुविधांच्या विकासावर भर दिला जाईल.

तिहेरी तलाकसह पर्सनल लॉसंदर्भात एक सुवर्णमध्य गाठण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्न करेल. यासाठी धार्मिक गुरु, सुधारणावादी मंडळी आणि समाजाच्या इतर घटकांसह या समाजातील विविध वैचारिक गटांमध्ये संवाद घडवून आणला जाणार आहे.

**तिहेरी तलाकसह पर्सनल लॉसंदर्भात एक सुवर्णमध्य गाठण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस प्रयत्न करेल. यासाठी धार्मिक गुरु, सुधारणावादी मंडळी आणि समाजाच्या इतर घटकांसह या समाजातील विविध वैचारिक गटांमध्ये संवाद घडवून आणला जाणार आहे.**

तिहेरी तलाकचा सध्याचा मसुदा या समाजाला विश्वासात न घेता तयार करण्यात आल्याने तो मोडीत काढला जाईल. त्याचप्रमाणे, शिक्षण आणि सुरक्षितता यासारख्या वर उल्लेखलेल्या मुद्द्यांवरही भर देण्यात येईल.

मुसलमान, ख्रिश्चन आणि भाषिक आणि इतर अल्पसंख्याक गटांमध्ये स्वयंरोजगार, उद्योजकता आणि रोजगाराला चालना देण्यासाठी वित्त संस्था उभारल्या जातील.

सरकारतर्फे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या खाजगी संस्थांमधील उच्च शिक्षणातील फीचा ५० टक्के वाटा उचलला जाईल.

अद्वितीय क्षमतांमुळे परदेशी शिक्षणासाठी निवडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना या कामात अर्थसाह्य केले जाईल.

न्यायालयात पडून असलेल्या प्रकरणांना सुनवाईसाठी घेतले जाईल आणि न्यायदानाची प्रक्रिया वेगाने पार पाडली जाईल.

अल्पसंख्याक तरुणांना शिक्षण, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षण आणि रोजगारासाठी योग्य माध्यमे उपलब्ध करून देण्यावर विशेष लक्ष दिले जाईल. याच प्रकारच्या सुविधा महिलांनाही दिल्या जातील. सुयोग्य स्वायत्त संस्थांना साह्य केले जाईल.

## लोकशाही संस्थांची चौकट बळकट करताना



सध्याच्या सरकारच्या कारकीर्दीत सर्वोच्च न्यायालय, रिझर्व्ह बँक, निवडणूक आयोग, सीबीआय आणि सीआयसी यासारख्या महत्त्वाच्या आणि माननीय संस्थांच्या कामकाजात बऱ्याचदा हस्तक्षेप केला जात आहे. यामुळे कमालीची अस्वस्थता वाढीस लागली आहे. या संस्थांच्या स्वातंत्र्याला यामुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. या संस्थांची पिछेहाट होत आहे.

लोकशाहीच्या तत्वांना बासनात गुंडाळून ठेवत पंतप्रधानांच्या मर्जीतील माणसांचा भरणा करण्याचा आरोप नुकताच निवडणूक आयोगावर करण्यात आला आहे. अर्थात, सरकारने हे प्रकरणही दाबून टाकले.

सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायाधीश कशाही प्रकारे, अनियंत्रित पद्धतीने खंडपीठाकडे प्रकरणे वर्ग करतात याविरोधात आवाज उठवण्यासाठी देशाच्या इतिहासात प्रथमच सर्वोच्च न्यायालयाच्या चार न्यायाधीशांना पत्रकार परिषद घ्यावी लागली. सध्याच्या सरकारला अडचणीत न आणता त्यांचा फायदा होईल अशाच प्रकारची प्रकरणे सरन्यायाधीश वर्ग करतात असा आरोप करण्यात आला होता. या चार न्यायाधीशांपैकी एक असलेल्या आर. गोगोई यांना सरन्यायाधीश म्हणून बढती दिल्यानंतरही न्यायालय आणि सरकार यांच्यात हा नेमणुकांचा वाद सुरूच आहे. दोन वरिष्ठ न्यायाधीशांना डावलून दोन कनिष्ठ न्यायाधीशांची सर्वोच्च न्यायालयात वर्णी लावली गेली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या बाबतीत बोलायचे झाले तर बँकेच्या अतिरिक्त राखीव निधीवर सरकारचा डोळा होता आणि त्यातूनच वाद निर्माण झाला, असे म्हटले जाते. तसेच, सेंट्रल बँकेने छोट्या व्यावसायिकांसाठी कर्जाचे नियम शिथिल करावेत, असेही सरकारला वाटत होते. तसेच बुडीत कर्ज प्रकरणी आरबीआयच्या कडक धोरणांमधील काही नियमांवरही सरकारने आक्षेप नोंदवले होते. श्री. ऊर्जित पटेल यांनी आपला कार्यकाळ

**सध्याचे सरकार वेगळ्या विचाराला, त्यांच्याशी सहमत नसणाऱ्याला गुन्हेगार ठरवून, त्यांचा आवाज बंद करून राष्ट्राला बाधा आणणारी संस्कृती जोपासू पाहत आहे. हे थांबवण्यासाठी परिणामकारक पावले उचलली जातील.**

पूर्ण होण्याआधीच राजीनामा दिल्यानेही अनेक प्रश्नचिन्हे निर्माण झाली आहेत.

राजकारणी आणि इतर नोकरशहा आरबीआयच्या गव्हर्नरांना त्यांनी काय करावे आणि काय करू नये हे सांगू लागलेत. त्यामुळे, आरबीआयच्या स्वायत्ततेला धोका निर्माण झाला आहे. ही स्वायत्तता अबाधित ठेवायला हवी.

सीबीआयला तर पिंजऱ्यातला पोपट बनवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांमधील वाद सर्वोच्च न्यायालयासमोर मांडला गेला. मात्र, तत्कालीन संचालक श्री. आलोक वर्मा यांना रात्रीत तडकाफडकी पदावरून काढून टाकल्याने सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. श्री. वर्मा यांची पुनर्नियुक्ती करून लगेच दुसऱ्या दिवशी त्यांना पदावरून काढून टाकणे आणि अंतरिम संचालकांची नेमणूक करणे यामुळे सीबीआयच्या प्रतिमेला तडा गेला आहे. खरे तर, बड्या उलाढालीतील, वरच्या पातळीवरील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी ही संस्था अग्रणी होती.

सीबीआयच्या नुकत्याच घडलेल्या प्रकरणात सीव्हीसीची भूमिकाही संशयास्पद आहे.

मुख्य माहिती आयुक्त आणि माहिती आयोग आणि माहितीच्या अधिकाराचा कायदा यासंदर्भात सरकारने याआधीच्या नियमांमध्ये, तरतुदींमध्ये हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला आहे.

संस्थाच्या स्थैर्याला योग्य महत्त्व दिले जाईल. कारण, कित्येक दशकांच्या प्रयत्नांतून भारताने अशा संस्था उभारल्या आहेत.

या संस्थांची स्वायत्तता, त्यांचे अखंडत्व आणि त्यांची विश्वासार्हता जपण्याला सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल आणि भारतीय वैविध्यतेचे संरक्षण केले जाईल.

सध्याचे सरकार वेगळ्या विचाराला, त्यांच्याशी सहमत नसणाऱ्याला गुन्हेगार ठरवून, त्यांचा आवाज बंद करून राष्ट्राला बाधा आणणारी संस्कृती जोपासू पाहत आहे. हे थांबवण्यासाठी परिणामकारक पावले उचलली जातील.

## सार्वजनिक खाजगी भागीदारीला नवसंजीवनी

पायाभूत सुविधांच्या क्षेत्राचा विकास करण्यासाठी भारताला २०४० पर्यंत तब्बल ४.४ ट्रिलियन डालर्सची गरज आहे. विविध वादांमुळे विकास प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे, अमर्याद विलंबाला आटोक्यात ठेवण्यासाठी संपूर्ण पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशीप (पीपीपी)ला नव्या रुपात मांडण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

धोरणे आणि नियमांमधील अडचणी, दीर्घ मुदतीच्या कर्जांचा तुटवडा, सार्वजनिक संस्थांमधील अपुरी क्षमता आणि पीपीपी प्रक्रियांचे नियंत्रण पाहणाऱ्या सार्वजनिक अधिकाऱ्यांची वानवा, सुयोग्य तांत्रिक मनुष्यबळाची कमतरता आणि पुरेशा प्रमाणात विश्वासार्ह प्रकल्प हाती नसणे अशा अनेक मुद्द्यांमुळे पीपीपी धोरणांना घरघर लागली आहे.

आयएलअँडएफएसच्या नुकत्याच घडलेल्या प्रकणावरून हे लक्षात आले की धोक्याचे योग्य मूल्यमापन न करणे आणि चुकीचे प्रकल्प डिझाईन करणे ही त्यांच्या ऱ्हासाची मुख्य कारणे आहेत. योगायोग असा की आयएलअँडएफएस पीपीपी प्रकल्पांमधील एक मोठे गुंतवणूकदार राहिले आहेत.

आता आपल्या देशाने दर्जेदार सुविधा उभारण्यावर भर द्यायला हवा.

पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना अर्थसाहय करताना नवे स्रोत धुंडाळण्यासाठी बहुविध माध्यमांचा वापर करावा लागेल. शिवाय, पर्यायी स्रोतांचा वापर करण्याची मागणीही वाढते आहे.

प्रकल्प राबवणाऱ्या कंपनीसोबत विविध भागधारकांसाठी स्ट्रक्चर्ड कॅपॅसिटी बिल्डिंग कार्यक्रम (संरचना

क्षमता उभारणी कार्यक्रम) राबवण्यावर भर देण्यात येईल. तसेच बँका आणि वित्त संस्था आणि खाजगी क्षेत्रासाठी सुनियोजित कार्यक्रम आखले जातील.

## MGNREGA (मनरेगा)



रोजगार उपलब्ध करून देत गरिबी दूर करणे, विशेषत: ग्रामीण भागात, हे आमचे लक्ष्य आहे.

जल संवर्धन, सार्वजनिक आरोग्य (स्वच्छतागृह) आणि रस्ते, अंगणवाड्यांचे बांधकाम आणि सार्वजनिक इमारतींचे बांधकाम या प्रकारची कामे आम्ही हाती घेऊ आणि ती पूर्णत्वास नेऊ.

चलसंचय विहिरी खोदणे आणि अधिक खोल करणे ही कामे विशिष्ट वेळेत पूर्ण केली जातील. जलयुक्त शिवारांना चालना दिली जाईल.

नरेगा अंतर्गत बागांची लागवड आणि उत्पादन कार्यक्रम राबवला जाईल आणि त्याची प्राधान्यक्रमाने अंमलबजावणी केली जाईल.

## जल आणि सिंचन विकास



कमी पर्जन्यवृष्टीच्या प्रदेशात आम्ही सिटू मॉइश्चर पद्धती लोकप्रिय करण्यावर भर देऊ.

कमाल क्षमतेने सिंचन व्हावे यासाठी जलसंवर्धनाची कामे आणि सिंचनाची क्षमता वाढविणे यावर पुरेसा भर दिला जाईल.

पाण्याचा सुयोग्य आणि परिणामकारक वापर करत उत्पादन वाढवण्यासाठी नव्या शेती पद्धती निर्माण करता याव्यात यासाठी खास कार्यक्रम राबवला जाईल.

शेतीचे नुकसान होऊ नये या उद्देशाने संरक्षित सिंचन कार्यक्रम राबवता यावा यासाठी जलसंचयाचे विक्रेंद्रीकरण करण्यावर आमचा भर असेल.

अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे आणि त्यातून अधिकाधिक पाण्याचा वापर करण्यास प्राधान्य दिले जाईल. शाश्वत शेतीसाठी आम्ही विविध कृषी हवामान पट्ट्यात नव्या कृषी पद्धती (शेती तसेच जोड उपक्रम) विकसित करू.

## गृहनिर्माण



आपले स्वत:चे घर असावे हे प्रत्येक भारतीयाचे स्वप्न पूर्ण करण्यास आम्ही बांधील आहोत. स्थलांतर हा शहरांमधील गंभीर प्रश्न आहे. आणखी झोपडपट्ट्या उभ्या राहू नयेत यासाठी आर्थिक दुर्बल घटक, कमी उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट यांच्यासाठी परवडणाऱ्या दरातील घरांची पुरेशा प्रमाणात निर्मिती केली जाईल.

द्वितीय आणि तृतीय श्रेणी शहरांमध्ये या प्रकारचे हाऊसिंग स्टॉक उभारले जातील.

भारतीय कुटुंबांसाठी किमान ३० मीटर हा घराचा आकार अपुरा आहे. ही मर्यादा वाढवून ५० मीटर केली जाईल. जेणेकरून संपूर्ण कुटुंब एकत्र राहू शकेल आणि स्थलांतराला आळा बसेल.

# उत्पन्नातील असमानता



असमानतेमुळे आर्थिक प्रगती मंदावते. यातून गरिबीविरोधातील लढ्यावरही परिणाम होतो आणि सामाजिक तेढ वाढते.

२०१८च्या ऑक्सफॅम अहवालानुसार देशाचे अधिकाधिक उत्पन्न ‘वरच्या १० टक्क्यांकडे आणि लोकसंख्येतील वरच्या १ टक्के लोकांकडे“ जात आहे. एकूणातच असमानता वाढली आहे. गरीब आणि श्रीमंतांमधील या दरीवर अत्यंत वेगाने उपाय करायला हवा.

२०१४ मध्ये सध्याच्या पंतप्रधानांनी वचन दिले होते की परदेशी बँकांमधील पै न पै ते परत आणतील आणि तो पैसा गरिबांच्या पुनर्वसनासाठी वापरला जाईल. या बाबतीत फारसे काही घडलेच नाही.

**कृषी विकासात सुधारणा, नोकऱ्यांच्या संदर्भातील प्रगती, कर प्रणालीत सुधारणा अशा काही महत्त्वाच्या मुद्यांसाठी उपक्रम राबवले जातील आणि त्यातून असमानता कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल.**

भारत हा जगातील एक अत्यंत असमानता असलेला देश आहे. २०१८च्या जागतिक असमानता अहवालानुसार आपल्या देशात एकूण संपत्तीच्या ५५ टक्के संपत्तीचे नियंत्रण वरच्या १० टक्के व्यक्तींच्या हातात आहे. १९८० मध्ये हे प्रमाण ३१ टक्के होते. तळातील ५० टक्क्यांच्या हाती फक्त १५.३ टक्के संपत्ती आहे. या अहवालात नमूद केल्यानुसार, १९८० पासून वरच्या १ टक्क्यांची संपत्ती वाढत आहे तर तळातील ५० टक्क्यांची संपत्ती घटत आहे.

आरोग्य आणि शिक्षणात अधिक गुंतवणूक करण्यावर भर दिला जाईल.

असमानतेच्या या वाढत्या समस्येला आळा घालण्यासाठी सर्वसमावेशक विकास आराखडा अंगिकारला आणि राबवला जाईल.

कृषी विकासात सुधारणा, नोकऱ्यांच्या संदर्भातील प्रगती, कर प्रणालीत सुधारणा अशा काही महत्त्वाच्या मुद्यांसाठी उपक्रम राबवले जातील आणि त्यातून असमानता कमी करण्याचा प्रयत्न केला जाईल.